## प्रकरण पाच

# शेतमजूरांची आर्थिक परिस्थिती

- शेतमजूरांची कौटुंबिक माहिती
- स्त्री शेतमजूरांची वैवाहिक स्थिती
- वयानुसार वर्गीकरण
- कुटुंबाचे आकारमान
- कुटुंबातील मिळविते सदस्य
- कुटुंबपद्धतीनुसार वर्गीकरण
- जातवार वर्गीकरण
- साक्षरता प्रमाण
- कामासाठी चालत जावे लागणारे अंतर
- भूधारक व भूमीहीन शेतमजूर कुटुंबे
- जमिनीचे आकारमान
- उत्पन्नासंबंधी माहिती
- उपभोगासंबंधी माहिती
- बचतीसंबंधी माहिती
- कर्जासंबंधी माहिती
- सामाजिक व सांस्कृतिक माहिती
- कुटुंबनियोजनविषयक माहिती.

.....

# प्रकरण पाचवे

## शेतमजुरांची आर्थिक परिस्थिती

### ५.१ शेतमजुरांची कौटुंबिक माहिती:

शेतमजुरांची आर्थिक स्थिती जाणून घेण्यासाठी केलेल्या या पहाणीत म्हैसाळ गावातील १०५ स्त्री शेतमजुरांचे सर्वेक्षण करण्यात आले. स्त्री शेतमजूरांच्या मुलाखती घेऊन भरलेल्या प्रश्नावलीच्या आधारावर विश्लेषण केले आहे.

यामध्ये स्त्री शेतमजूरांची कौटुंबिक माहिती, उत्पन्न, उपभोग, बचत कर्जबाजारीपणा, सामाजिक सांस्कृतिक माहिती, कुटुंबनियोजनविषयक माहिती मांडलेली आहे.

### अ) स्त्री शेतमजुरांची वैवाहिक स्थिती:

निवडलेल्या अभ्यास क्षेत्रातील १०५ स्त्री शेतमजूरांच्या वैवाहिक स्थितीविषयी माहिती गोळा केली. निवडलेल्या १०५ स्त्री शेतमजुरांपैकी ९१ (८६.६७ टक्के) शेतमजूर स्त्रिया विवाहीत आहेत. ८(७.६१ टक्के) शेतमजूर स्त्रिया विवाहीत आहेत. ४ स्त्रिया अविवाहीत व २ परित्यक्त्या आहेत. खालील कोष्टक क्र. ५.१ वरून स्त्री शेतमजूरांच्या वैवाहिक स्थितीची मामीहती मिळते.

कोष्टक क्र. ५.१

स्त्री शेतमजूरांची विवाहिक स्थिती

| अ.नं. | वैवाहिक स्थिती | संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १) | विवाहीत | ९१ | ८६.६७ |
| २) | अविवाहीत | ४ | ३.८२ |
| ३) | विधवा | ८ | ७.६१ |
| ४) | परित्यकत्या | २ | १.९० |
| | एकूण .. | १०५ | १००.०० |

कोष्टक क्र. ५.१ वरून असे दिसून येते की, निवडलेल्या १०५ स्त्री शेतमजूरांमध्ये अविवाहीत स्त्रियांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. विवाहीत स्त्रियांचे प्रमाण जास्त असण्याचे कारण कुटुंबाच्या आर्थिक स्थितीला हातभार लावणे हे आहे. तर अविवाहीत स्त्रियांचे प्रमाण कमी असण्याचे कारण अविवाहीत मुलींना सहसा कामावर पाठविले जात नाही. त्या घरची इतर सर्व कामे पार पाडतात.

ब) वयानुसार वर्गीकरण:

निवडलेल्या १०५ स्त्रिया सर्व वयोगटातील आहेत. वयोगटानुसार स्त्री शेतमजुरांचे १० गट पाडले. वेगवेगळे वयोगट व त्यामध्ये येणाऱ्या स्त्री शेतमजूरांची संख्या खालीलप्रमाणे -

## कोष्टक क्र. ५.२

## स्त्री शेतमजुरांचे वयानुसार वर्गीकरण

| अ.नं. | वयोगट | संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १) | १५ वर्षांखालील | ३ | २.८४ |
| २) | १५ - २० वर्षे | २ | १.९७ |
| ३) | २१ - २५ " | २२ | २०.९५ |
| ४) | २६ - ३० " | १४ | १३.३३ |
| ५) | ३१ - ३५ " | १७ | १६.१८ |
| ६) | ३६ - ४० " | २० | १९.०३ |
| ७) | ४१ - ४५ " | १६ | १५.२३ |
| ८) | ४६ - ५० " | ९ | ८.५७ |
| ९) | ५१ - ५५ " | १ | ०.९५ |
| १०) | ५६ - ६० " | १ | ०.९५ |
| | एकूण .. | १०५ | १००.०० |

कोष्टक क्र. ५.२ वरून असे दिसून येते की, निवडलेल्या १०५ स्त्री शेत-मजुरापैकी २१ ते २५ वयोगटात सर्वात जास्त म्हणजे २२(२०.९५ टक्के) स्त्रिया आहेत. त्याखालोखाल ३६ - ४० वयोगटातील २० (१९.०३ टक्के) स्त्रिया आहेत. ३१ - ३५ वयोगटातील १७(१६.१८ टक्के) स्त्रिया व ४१-४५ वयोगटातील १६(१५.२३) स्त्रिया आहेत. १५ वर्षांखालील म्हणजेच बाल स्त्री मजूरांची संख्या ३(२.८५ टक्के) आहे. त्याखालोखाल १५-२० वयोगटातील २(१.९९ टक्के) स्त्रिया आहेत. ५१-५५ व ५६-६० या वयोगटातील प्रत्येकी १ शेतमजूर स्त्री आहे.

थोडक्यात कोष्टकावरून असे दिसून येते की, २० वर्षापर्यंतच्या स्त्रियांना अत्यंत कमी प्रमाणात कामावर पाठविले जाते. २१-४५ वयोगटातील स्त्री शेतमजूरांची संख्या जास्त आहे. ४६-६० या वयोगटातील स्त्रियादेखील कमी प्रमाणात आहेत.

क) आकारमान:

कोष्टक क्र. ५.३ वरून स्त्री शेतमजुरांच्या कुटुंबाचे आकारमान समजते.

कोष्टक क्र. ५.३

स्त्री शेतमजूरांच्या कुटुंबाचे आकारमान

| अ.नं. | सदस्य संख्या | कुटुंब संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १) | २ | १ | ०.९५ |
| २) | ३ | ८ | ७.६२ |
| ३) | ४ | १४ | १३.३३ |
| ४) | ५ | ३७ | ३५.२४ |
| ५) | ६ | २७ | २५.७३ |
| ६) | ७ | ८ | ७.६२ |
| ७) | ८ | ७ | ६.६६ |
| ८) | ९ | २ | १.९० |
| ९) | १० | १ | ०.९५ |
| | | | १००.०० |

कोष्टक क्र. ५.३ मध्ये निवडलेल्या १०५ स्त्री शेतमजूरांच्या कुटुंबाचे प्रत्येकी २ ते १० सदस्यसंख्या याप्रमाणे नऊ भागात वर्गीकरण केले आहे. ५ सदस्य संख्या असलेल्या कुटुंबाची संख्या सर्वात जास्त आहे.

भारतात ५ लोकांचे एक कुटुंब असे गृहीत धारलेले आहे. एका कुटुंबात एक - एक स्त्री पुरुष व तीन मुले असा सर्वसाधारण आकार गृहीत आहे. म्हणजेच भारताच्या कुटुंब संकल्पनेच्या तुलनेत बसणारी ३७(३५.२४ टक्के) कुटुंबे आहेत. यावरुन शेतमजूर कुटुंबामध्ये कुटुंबनियोजन शस्त्रक्रियेचा प्रसार झालेला आहे. असे म्हणता येईल. याचे श्रेय ब-याच प्रमाणात सरकारी दवाखान्यांकडे जाते. त्यानी कुटुंबनियोजन कार्यक्रम चांगल्या पध्दतीने राबविला आहे असे म्हणता येईल.

सहा सदस्य संख्या असलेली कुटुंबे २७(२५.७३ टक्के) आहेत. सर्वात कमी १ (०.९५ टक्के) संख्या २ व १० सदस्य संख्या असलेल्या कुटुंबाची आहे.

कोष्टकावरुन असे दिसून येते की, ४ ते ६ सदस्यसंख्या असलेली कुटुंबे ७८ टक्के म्हणजे सर्वात जास्त आहेत. ४ पेक्षा कमी व ६ पेक्षा जास्त सदस्य संख्या असलेली कुटुंबे कमी आहेत.

ड) <u>कुटुंबातील मिळवते सदस्य:</u>

अभ्यासक्षेत्रातील गावातील स्त्री शेतमजूरांशिवाय तिच्या कुटुंबातील इतर काम करणारे स्त्री पुरुष यांचीही माहिती घेतली गेली. त्यावरुन असे दिसून आले की, एकूण स्त्री-पुरुष काम करणा-यामध्ये शेतमजूर म्हणून काम करणा-या लोकांची संख्या जास्त आहे. मिळवत्या सदस्यांची संख्या किती आहे. या-संबंधीची माहिती कोष्टक क्र.५.४ मध्ये दिली आहे.

कोष्टक क्र.५.४

स्त्री शेतमजुरांच्या कुटुंबातील मिळविते सदस्य

| अ.नं. | मिळविते सदस्य | कुटुंबाची संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १) | १ | ६ | ५.७१ |
| २) | २ | ५५ | ५२.३९ |
| ३) | ३ | २२ | २०.९६ |
| ४) | ४ | १८ | १७.१४ |
| ५) | ५ | ३ | २.८५ |
| ६) | ६ | १ | ०.९५ |
| | | १०५ | १००.०० |

निवडलेल्या अभ्यास क्षेत्रातील स्त्री शेतमजुरांची संख्या १०५ आहे. कोष्टक क्र. ५.४ वरून असे दिसून येते की, १०५ स्त्री शेतमजूर कुटुंबापैकी २ सदस्य मिळविते असलेल्या कुटुंबांची संख्या सर्वात जास्त म्हणजे ५५ (५२.३९ %) आहे. ही संख्या जास्त असण्याचे कारण बहुतेक कुटुंबातील स्त्री-पुरुष दोघेही रोजंदारी करतात.

याशिवाय ३ सदस्य मिळविते असलेल्या कुटुंबांची संख्या २२(२०.९६ टक्के) आहे. त्याखालोखाल चार सदस्य मिळविते असलेल्या कुटुंबाची संख्या १८ (१७.१४ टक्के) आहे.

यावरून असा निष्कर्ष निघू शकतो की, जवळजवळ ५० टक्के कुटुंबामध्ये स्त्री-पुरुष दोघेही रोजगारी करतात. तसेच ४ पेक्षा जास्त सदस्य रोजगारी करणाऱ्या कुटुंबाची संख्या कमी आहे. कारण इतके सदस्य असलेली कुटुंबे कमी आहेत आणि जी आहेत त्यामध्ये लहान मुलांचा समावेश होतो. याशिवाय कुटुंबातील सर्वांनाच रोजगार मिळतो असे नाही.

इ) कुटुंबपध्दतीनुसार वर्गीकरण:

भारतात एकत्र/संयुक्त कुटुंबपध्दती व विभक्त कुटुंबपध्दती अशी दोन प्रकारची कुटुंबपध्दती आढळते. परंतु एकत्र कुटुंबपध्दती अलीकडे कमी झालेली आहे व विभक्त कुटुंबाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. निवडलेल्या स्त्री शेतमजूरांच्या कुटुंबाबाबतीतही असेच स्वरूप दिसून येते. कोष्टक क्र.५.५ हे स्पष्ट होते.

कोष्टक क्र. ५.५

स्त्री शेतमजूरांची कुटुंबपध्दतीप्रमाणे विभागणी

| अ.नं. | कुटुंबाचा प्रकार | संख्या | प्रमाण (टक्के) |
| --- | --- | --- | --- |
| १) | एकत्र | २० | १९.४ |
| २) | विभक्त | ८५ | ८०.९५ |
| | एकूण .. | १०५ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, ८०.९५ टक्के कुटुंबे ही विभक्त कुटुंब प्रकारामध्ये मोडतात. याचाच अर्थ रोजगार संधीचा अभाव, त्यामुळे प्रत्येकजण चरितार्थासाठी बाहेर पडू लागल्यामुळे व एकत्र कुटुंबपध्दतीतील दोष इ. मुळे विभक्त कुटुंबाचे प्रमाण जास्त असल्याचे दिसते. तर एकत्र कुटुंबपध्दतीही ग्रामीण भागात आजही आढळते. आई, वडील, बहीण, भाऊ, भावजय अशीसर्व मंडळी आजही काही कुटुंबामध्ये एकत्र राहताना दिसतात. मात्र त्यांची संख्या (निवडलेल्या स्त्री शेतमजूर कुटुंबामध्ये) फक्त २० (१९.४ टक्के) इतकीच आहे.

जातवार वर्गीकरण:

निवड केलेली १०५ स्त्री शेतमजूर कुटुंबे वेगवेगळया जाती धर्माची आहेत.

कोष्टक क्र. ५.६ ची पाहणी केली असता निवडलेली १०५ कुटुंबे ही एकूण १४ जातीची आहेत. त्यापैकी सर्वात जास्त कुटुंबे हिंदु धर्माची आहेत. त्याखालोखाल जैन धर्माची १३ (१२.३८ टक्के) कुटुंबे, मुस्लीम धर्माची ११(१०.४८ टक्के) कुटुंबे आहेत. याशिवाय जातवार कुटुंबांची माहिती खालील कोष्टकावरुन अधिक स्पष्ट होते.

कोष्टक क्र.५.६

स्त्री शेतमजूर कुटुंबाचे जातवार वर्गीकरण

| अ.नं. | जात | संख्या | प्रमाण टक्के |
|---|---|---|---|
| १) | बिगर मागासवर्गीय एकूण .. | ५६ | ५३.३३ |
| १) | मराठा | २८ | २६.६७ |
| २) | लिंगायत | ४ | ३.८१ |
| ३) | जैन | १३ | १२.३८ |
| ४) | मुस्लिम | ११ | १०.४८ |
| ५) | मागासवर्गीय एकूण .. | ४९ | ४६.६७ |
| ६) | महार | ९ | ८.५७ |
| ७) | मांग | १२ | ११.४३ |
| ८) | चांभार | ८ | ७.६२ |
| ९) | धनगार | ११ | १०.४८ |
| १०) | वडर | ३ | २.८६ |
| ११) | बागडी | २ | १.९० |
| १२) | न्हावी | २ | १.९० |
| १३) | बुरड | १ | ०.९५ |
| १४) | कोरवी | १ | ०.९५ |
| | एकूण .. | १०५ | १००.०० |

कोष्टक क्र. ५.६ वरून असे दिसून येते की, एकूण शेतमजूर स्त्रियांमध्ये मागासवर्गीय जातीच्या स्त्रिया सर्वाधिक म्हणजे ४९ (४६.६६ टक्के) आहेत. यावरून असे म्हणता येईल की ग्रामीण भागात घराबाहेरील कामे करण्यामध्ये मागासवर्गीय स्त्रिया जास्त आहेत. त्याखालोखाल मराठा जातीतील २८(२६.६७ टक्के) आहेत. म्हणजेच अलीकडे मराठा जातीतील स्त्रियादेखिल रोजंदारी करु लागल्या आहेत. त्याखालोखाल जैन स्त्रिया १३(१२.३८ टक्के) व मुस्लिम स्त्रिया ११(१०.४८ टक्के) आहेत. म्हणजेच हळूहळू सर्व जातीतील स्त्रिया शेतमजुरी करु लागल्या आहेत. तरीदेखील तुलनात्मक विचार करता मागासवर्गीय स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे.

## ५.२ कामासाठी जावे लागणारे अंतर:

शेतमजूरी करणाऱ्या स्त्रियांच्या बाबतीत एक महत्त्वाचा घटक विचारात घ्यावा लागतो तो म्हणजे त्यांना कामासाठी फार दूरपर्यंत चालत जावे लागते. वेतनाचा विचार करताना हा घटक विचारात घेतला जात नाही. त्यांना जाता येता चालत जावे लागणारे अंतर विचारात घेतले तर साधारणपणे तास ते दीड तास वेळ तेवढे अंतर चालत जाण्यासाठी लागतो.

कोष्टक क्र. ५.७

स्त्री शेतमजुरांना चालत जावे लागणारे अंतर

| अ.नं. | चालत जावे लागणारे अंतर | संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १) | २ कि.मी. पर्यंत | २ | १.९० |
| २) | २.१ ते ४ कि.मी. पर्यंत | ७४ | ७०.४८ |
| ३) | ४.१ ते ६ -"- | २८ | २६.६७ |
| ४) | ६ पेक्षा जास्त -"- | १ | ०.९५ |
| | एकूण .. | १०५ | १००.०० |

कोष्टक क्र. ५.७ वरून असे दिसून येते की, ७० टक्के शेतमजूर स्त्रियांना (७४ स्त्रियांना) ४ कि.मी. पर्यंत चालत जावे लागते. २८ (२६.६०) स्त्रियांना ६ कि.मी. पर्यंत चालत जावे लागते. यावरून असे म्हणता येईल की शेतमजूर स्त्रियांना कामासाठी सरासरीने दोन तास (जाता - येता) इतके अंतर चालत जावे लागते.

भूधारक व भूमीहीन शेतमजूर कुटुंबे:

निवडलेल्या १०५ स्त्री शेतमजूर स्त्रियांच्या कुटुंबाच्या मालकीची जमीन आहे की नाही किती कुटुंबाच्या मालकीची जमीन आहे. याविषयीही माहिती गोळा केली. कोष्टक क्र. ५.८ मध्ये यासंबंधीची माहिती दिली आहे.

कोष्टक क्र. ५.८

भूधारक व भूमीहीन स्त्री शेतमजूर कुटुंबाचे वर्गीकरण
(सर्व जमीन जिरायत आहे)

| अ.नं. | प्रकार | संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | भूधारक स्त्री शेतमजूर | ११ | १०.४७ |
| २) | भूहीन स्त्री शेतमजूर | ९४ | ८९.५३ |
| | एकूण .. | १०५. | १००.०० |

कोष्टक क्र.५.८ वरून असे दिसून येते की, निवडलेल्या स्त्री शेतमजूर कुटुंबापैकी फक्त ११ (१०.४७ टक्के) स्त्री शेतमजूरांच्या कुटुंबाच्या मालकीची शेतजमीन आहे. तर ९४ (८९.५३ टक्के) स्त्री शेतमजूरांच्या कुटुंबाच्या मालकीची शेतजमीन नाही. यावरून असे म्हणता येईल की जमीन नसल्यामुळेच स्त्री शेतमजूरांना मजूरी करावी लागत असावी.

## ५.४ जमीनीचे आकारमान:

अभ्यासासाठी निवडलेल्या १०५ स्त्री शेतमजुरांपैकी फक्त ११ शेतमजूर भूधारक आहेत. बाकीचे ९४ शेतमजूर भूमीहीन आहेत. खालील कोष्टक क्र. ५.९ मध्ये भूधारक स्त्री शेतमजूर कुटुंबाची माहिती दिली आहे -

कोष्टक क्र. ५.९

स्त्री शेतमजूर कुटुंबाच्या मालकीच्या जमीनीचे आकारमान

| अ.नं. | जमिनीचे आकारमान | शेतमजूर कुटुंबाची संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १) | अर्धा एकर पर्यंत | ३ | २७.२७ |
| २) | अर्धा ते १ एकर पर्यंत | ५ | ४५.४६ |
| ३) | १.१ ते २ एकर | ३ | २७.२७ |
| | एकूण .. | ११ | १००.०० |

भूधारक शेतमजूर कुटुंबे ११ असून त्यापैकी अर्धा ते १ एकर जमीन असलेली ५(४५.४५ टक्के) भूधारक स्त्री शेतमजूर कुटुंबे आहेत. अर्धा ऐकर ते एक एकर जमीन असलेली ५ (४५.४६ टक्के) भूधारक शेतमजूर कुटुंबे आहेत. अर्धा एकर पर्यंत जमीन असलेली ३ (२७.२७ टक्के) तर १ ते २ एकर जमीन असलेली ३(२७.२७ टक्के) कुटुंबे आहेत.

वरील कोष्टकावरून असा निष्कर्ष काढता येईल की, भूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण कमी असून ज्यांच्या मालकीची जमीन आहे. तीही अत्यंत कमी जिरायत प्रकारामध्ये मोडणारी आहे. त्यामुळेच स्त्रियांनाही शेतमजूरी करावी लागते.

फ) साक्षरता:

निवडलेल्या अभ्यासक्षेत्रातील स्त्री शेतमजूरांच्या कुटुंबातील मुलांचे, मुलींचे स्वतः शेतमजूर स्त्रीचे तसेच पुरूष यांच्या साक्षरतेविषयी प्रश्नावलीच्या आधारे माहिती गोळा केली. निवडलेल्या १०५ स्त्री शेतमजुरांपैकी २० शेतमजूर स्त्रिया साक्षर आहेत. त्यापैकी पहिली ते चौथी पर्यंत शिकलेल्या ११ स्त्रिया आहेत. ७ स्त्रिया पाचवी ते सातवी पर्यंत शिकलेल्या आहेत. आठवी ते दहावी पर्यंत शिक्षण झालेली १ स्त्री आहे. तोच अकरावी पर्यंत शिक्षण घेतलेली एक स्त्री आहे. यावरून असे म्हणता येईल की शेतमजूर स्त्रियांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे.

"स्त्री" शेतमजूर कुटुंबातील पुरूषांच्या साक्षरतेचे प्रमाणही अत्यंत कमी आहे. ८ पुरूषांचे पहिली ते पाचवी पर्यंत शिक्षण झालेले आहे. १३ जणांचे पाचवी ते सातवी पर्यंत शिक्षण झालेले आहे. ८ जणांचे आठवी ते दहावी पर्यंत शिक्षण झालेले आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेतलेला एकही पुरूष नाही.

एकूण १७६ मुलामुलींपैकी ५ वर्षाखालील ५४ बालके (मुले अधिक मुली) आहेत. पाच वर्षावरील १२२ मुलामुलींपैकी ११५ मुली, मुली साक्षर आहेत. त्यापैकी ७९ मुले साक्षर तर ३६ मुली साक्षर आहेत. ७९ पैकी पहिली ते चौथी पर्यंत शिकत असलेली ३४, पाचवी ते सातवी पर्यंत शिकत असलेली २५, आठवी ते १० पर्यंत शिकत असलेली १२ व महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेली ८ मुले आहेत. मुलींपैकी पहिली ते चौथीपर्यंत २३ मुली, पाचवी ते सातवी पर्यंत ९, आठवी ते दहावी पर्यंत ४ मुली शिकत आहेत .

साक्षरतेच्या मिळालेल्या माहितीवरून असा निष्कर्ष निघू शकतो की, स्त्री शेतमजूरांच्या साक्षरतेचे प्रमाण कमी असले तरी त्यांना शिक्षणाचे महत्त्व कळू लागलेले आहे. कारण त्या आपल्या मुलींना शिक्षण देऊ लागलेल्या आहेत. म्हणूनच ५ वर्षावरील १२२ मुलामुलींपैकी ११५ मुले-मुली शिक्षण घेत आहेत.

मुलींच्या साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा मुलांच्या साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. कारण मुलींना घरची कामे करण्यासाठी शाळेला कमी प्रमाणात पाठविले जाते.

कोष्टक क्र.५.१०

साक्षरता प्रमाण

| अ.नं. | घटक | ५ वर्षाच्या आतील मुले-मुली | १ ते ४ | ५ ते ७ | ८ ते १० | महाविद्यालयीन | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | स्त्री शेतमजूर | - | ११ | ७ | १ | १ | २० |
| २) | पुरुष शेतमजूर | - | ८ | १३ | ८ | - | २९ |
| ३) | मुले | २९ | ३४ | २४ | १२ | ८ | १०८ |
| ४) | मुली | २५ | २३ | ९ | ४ | - | ६१ |

थोडक्यात वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, स्त्री शेतमजूरांपैकी २० स्त्रिया साक्षर आहेत. एकूण १०८ मुलांपैकी २९ मुले, ५ वर्षाच्या आतील आहेत. ७९ मुले साक्षर आहेत. ६१ मुलींपैकी २५ मुली पाच वर्षाच्या आतील असून ३६ मुली साक्षर आहेत. ५ वर्षावरील मुलामुलींची एकूण संख्या १२२ असून त्यापैकी ११५ (७९ अधिक ३६) मुले-मुली साक्षर आहेत. महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेली एकही मुलगी नाही.

प्राप्ती अथवा उत्पन्नासंबंधी माहिती:

प्राप्ती अथवा उत्पन्न म्हणजे विशिष्ट कालावधीत, पैशाच्या अथवा वस्तूच्या स्वरूपात किंवा दोन्हीमध्ये, एखाद्या सेवेबद्दल किंवा कामाबाबतचा मिळालेला आर्थिक मोबदला होय.

शेतमजूर कुटुंबातील व्यक्तींना निरनिराळ्या मार्गांनी उत्पन्न मिळते. शेतीरोजगार, बिगर शेती रोजगार स्वत:ची जमीन लागवडीखाली आणणे, पशुपालन इ. मार्गाने शेतमजूर कुटुंबे उत्पन्न मिळवितात. परंतु इतर सर्व मार्गांनी मिळविलेल्या उत्पन्नापेक्षा शेतमजूरीपासून मिळविलेले उत्पन्न जास्त आहे. सर्व मार्गांनी मिळालेल्या उत्पन्नाचा मुलाखतीच्या आधारे आढावा घेतला आहे.

शेतमजूर कुटुंबाचे वार्षिक सरासरी उत्पन्न:

शेतमजुरी, बिगर शेतमजुरी व स्वत: जमीन कसून मिळालेले उत्पन्न, पशुपालनापासून मिळालेले उत्पन्न व त्याप्रमाणे शेतमजूर कुटुंबाची विभागणी कोष्टक क्र. ५.११ मध्ये दाखविली आहे.

कोष्टक क्र.५.११

स्त्री शेतमजूर कुटुंबाचे वार्षिक सरासरी उत्पन्न

| अ.नं. | उत्पन्नाचे मार्ग | कुटुंबाची संख्या | सरासरी वार्षिक उत्पन्न (रुपये) |
|---|---|---|---|
| १) | शेतमजुरी | १०५ | ८०५०.५७ |
| २) | शेती (जमीन लागवड) | ११ | ३१०१.८१ |
| ३) | पशुपालन | ३९ | ३२१८.९७ |
| ४) | इतर नोकरी/व्यवसाय | २५ | ७५१६.०० |
| | एकूण सरासरी उत्पन्न | १०५ | ११३६०.५९ |

स्वत:ची शेती असलेली कुटुंबे सर्वात कमी आहेत. तसेच शेतीपासून मिळणारे उत्पन्नाचे प्रमाण देखील कमी आहे. शेतमजूरीपासून उत्पन्न मिळणारी कुटुंबे सर्वच्या सर्व १०५ असून स्त्री शेतमजूर कुटुंबातील अधिक लोक शेतमजूरीच करतात. त्यामुळे शेतमजूरीपासून मिळणारे सरासरी उत्पन्न सर्वाधिक म्हणजे ८०५०.५७ इतके आहे. त्याखालोखाल इतर नोकरी/व्यवसायापासून मिळणारे सरासरी उत्पन्न रु. ७५१६.०० आहे. पशुपालन करणाऱ्या कुटुंबाची संख्या ३९ असून वार्षिक सरासरी उत्पन्न ३२१८.९७ आहे. पशुपालनापासून मिळणारे उत्पन्न कमी असण्याचे कारण शेतमजूर कुटुंबे प्रामुख्याने शेळी, कोंबडी, एखादी गाय, म्हैस इ. लहान प्रमाणात पशूपालन करीत असतात. कुटुंबामध्ये दुभती जनावरे स्वत:च्या कुटुंबाची गरज भागविण्यासाठी पाळली जातात.

कोष्टक क्र.५.११ वरुन असे दिसून येते की १०५ कुटुंबाचे शेतमजूरी, शेती, पशुपालन इतर नोकरी/व्यवसाय या मार्गांनी मिळालेले वार्षिक सरासरी उत्पन्न रु. ११३६०.५९ आहे.

<u>उपभोगासंबंधी माहिती :</u>

निवडलेल्या १०५ स्त्री शेतमजूरांच्या कुटुंबाचा १९९०-९१ या वर्षातील उपभोग खर्च किती होता याविषयी १०५ स्त्रियांना प्रश्नावलीच्या आधारे माहिती विचारली. कोष्टक क्र.५.१२ वरुन स्त्री शेतमजूर कुटुंबाचा १९९०-९१ वर्षातील सरासरी उपभोग खर्च कळून येतो -

## कोष्टक क्र.५.१२

### स्त्री शेतमजूर कुटुंबाचा वार्षिक सरासरी उपभोग खर्च - १९९०-९१

| अ.नं. | खर्चाची बाबत | झालेला खर्च रुपये | झालेल्या खर्चाचे एकूण खर्चाशी प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | अन्नधान्य | ७१०३.८१ | ७१.०६ |
| २) | घरभाडे | १८०.०० | १.८० |
| ३) | शिक्षणखर्च | १२६.११ | १.२६ |
| ४) | इंधन | २०९.०० | २.०९ |
| ५) | औषधोपचार | २३२.३८ | २.३२ |
| ६) | वाहतूक | १७०.४८ | १.७१ |
| ७) | करमणूक | ७२.१० | ०.७२ |
| ८) | कपडे | ११७३.३३ | १४.७२ |
| ९) | सण समारंभ धार्मिक यात्रा | ११७.०५ | १.१७ |
| १०) | साबण व सौंदर्यप्रसाधन | १४१.३८ | १.४१ |
| ११) | घरदुरुस्ती | १०७.६१ | १.०७ |
| १२) | धार्मिक विधी | ३३.०९ | ०.३३ |
| १३) | इतर | २८.५२ | ०.२९ |
| | एकूण .. | ९९९६.७४ | १००.०० |

कोष्टक क्र. ५.१२ मध्ये स्त्री शेतमजूर कुटुंबाचा वार्षिक सरासरी उपभोगखर्च दर्शविला आहे. कुटुंबाचा सर्वात जास्त म्हणजे एकूण खर्चाच्या ७१.०६ टक्के खर्च अन्नधान्यावर होतो.

अन्नधान्याखालोखाल कपड्यावरील खर्चाचा नंबर लागतो. कपड्यासाठी ९०-९१ या वर्षात रु. ११७३.३३ खर्च झाले. याशिवाय जळण, औषधोपचार,

वाहतूक यासाठी अनुक्रमे २०९ (२.०९ टक्के), २३२.३८ (२.३२ टक्के) १७०.४८ (१.७१ टक्के) खर्च झाले.

बऱ्याच शेतमजूर कुटुंबांना घरे मोफत मिळाली आहेत. तसेच काही शेतमजूर कुटुंबे लहानशा झोपडीमध्ये राहतात. त्यामुळे घरभाड्याची रक्कम अत्यंत कमी म्हणजे रु. ९८०/- इतकी आहे.

कुटुंबाच्या ९०-९१ या वर्षातील एकूण खर्चापैकी ८५ टक्के हा अन्नधान्य व कपड्यावर खर्च होतो. शेतमजूर कुटुंबाचा शिक्षणावरील खर्चदेखील अत्यल्प म्हणजे रु. १२६.१९ (१.२६ टक्के) होता. शेतमजूर कुटुंबाचा करमणुकीवरील खर्चदेखील अत्यंत कमी होता.

सरासरी उत्पन्न व सरासरीउपभोग खर्च यांचा एकत्रित विचार करता या स्त्री शेतमजूर कुटुंबाची वार्षिक सरासरी बचत रु. १३६३.२६ इतकी दिसते.

बचतीसंबंधी माहिती:

निवडलेल्या १७५ स्त्री शेतमजूर कुटुंबापैकी ६० कुटुंबे म्हणजे शेकडा ५७.१४ टक्के कुटुंबे बचत करतात. अर्थात ही बचत अत्यल्प आहे. ज्या शेतमजूर कुटुंबात जास्त लोक रोजगार करतात, ज्यांच्या घरी जनावरे पाळली जातात अशा लोकांकडून काही प्रमाणात बचत केली जाते. कोष्टक क्र. ५.१३ वरून बचतीचे स्वरूप स्पष्ट होते.

## कोष्टक क्र. ५.१३

## शेतमजूर कुटुंबांच्या बचतीचा प्रकार

| अ.नं. | बचतीचा प्रकार | संख्या | बचत करणाऱ्या एकूण (६०) कुटुंबाशी प्रमाण % |
|---|---|---|---|
| १) | घरी शिल्लक | २ | ३.३३ |
| २) | भिशीत | ४५ | ७५.०० |
| ३) | स्थानिक पतसंस्थेत | ११ | १८.३४ |
| ४) | इतर बँकेत | २ | ३.३३ |
| | एकूण .. | ६० | १००.०० |

कोष्टक क्र.५.१३ वरून असे दिसून येते की, ४५ (७५ टक्के) कुटुंबे भिशीमध्ये बचत करतात. ११(१८.३४ टक्के) कुटुंबे स्थानिक सहकारी पतसंस्थेत ठेवतात. २ कुटुंबे घरी शिल्लक ठेवतात व २ कुटुंबे इतर बँकेत बचत करतात. निवडलेल्या क्षेत्रातील स्त्री शेतमजूरांचा भिशीत पैसे ठेवण्याचा जास्तीत जास्त कल दिसतो. तसेच स्थानिक पतसंस्थेत पैसे ठेवणाऱ्यांचे प्रमाणही बऱ्यापैकी आहे. ४५ कुटुंबे बचत करीत नाहीत.

कोष्टक क्र. ५.१४ वरून बचत गट व बचत करणारी कुटुंबे इ. माहिती समजते.

कोष्टक क्र. १४

स्त्री शेतमजूर कुटुंबांची आठवडयाची बचत

| अ.नं. | साप्ताहिक बचत गट रुपये | संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | ५ पर्यंत | ६ | १०.०० |
| २) | ६ ते १० | १९ | ३१.६६ |
| ३) | ११ ते २० | १५ | २५.०० |
| ४) | २१ ते ३० | १३ | २१.६७ |
| ५) | ३१ ते ४० | ५ | ८.३३ |
| ६) | ४१ ते ५० | १ | १.६७ |
| ७) | ५१ ते ६० | १ | १.६७ |
| | | ६० | १००.०० |

कोष्टक क्र.५.१४ वरून असे दिसून येते की, आठवडयाला ६ ते १० रुपये बचत करणारी सर्वात जास्त म्हणजे एकूण १९ (३१.६६ टक्के) कुटुंबे आहेत. रु. ११ ते २० पर्यंत बचत करणारी १५ (२५ टक्के) कुटुंबे आहेत. तसेच ४० रु. पेक्षा जास्त बचत करणारी फक्त २ कुटुंबे आहेत.

कर्जासंबंधी माहिती:

शेतमजूर कुटुंबाना वर्षभर काम मिळत नाही. तसेच मजुरीचा दरही कमी असतो. शिवाय महागाई या सर्व कारणामुळे त्यांना त्यांचे उत्पन्न वर्षाचा सर्व प्रकारचा खर्च भागविण्यास अपुरे पडते व त्यांच्या इतर गरजा, अचानक निर्माण होणारे प्रसंग वगैरेसाठी त्यांना कर्ज काढणे अपरिहार्य असते. निवडलेल्या स्त्री शेतमजूरांच्या कुटुंबापैकी काही कुटुंबे कर्ज काढतात. काही कुटुंबे उधार उसण-वारीने व्यवहार करतात. कोष्टक क्र.५.१५ वरून स्त्री शेतमजूर कुटुंबाच्या कर्जाचे स्वरूप लक्षात येते.

कोष्टक क्र.५.१५

स्त्री शेतमजूर कुटुंबाचा कर्जबाजारीपणा (वार्षिक) ९०-९१

| | | |
|---|---|---|
| १) | एकूण शेतमजूर कुटुंबे | १०५ |
| २) | ऋणग्रस्त शेतमजूर कुटुंबे | १८ |
| ३) | एकूण कर्ज रुपये | ५१४९९.०० |
| ४) | एकूण शेतमजूर कुटुंबाशी प्रमाण (टक्के) | १७.१४ |
| ५) | ऋणग्रस्त शेतमजूर कुटुंबाचे सरासरी कर्ज रुपये | २८६१.११ |
| ६) | निवडलेल्या एकूण शेतमजूर कुटुंबाचे सरासरी कर्ज रु. | ४९०.४७ |

कोष्टक क्र.५.१५ वरून असे दिसून येते की, एकूण १०५ स्त्री शेतमजूर कुटुंबापैकी कर्जबाजारी शेतमजूर कुटुंबे १८ आहेत. निवडलेल्या एकूण कुटुंबाशी हे प्रमाण १७.१४ टक्के आहे. तसेच कर्ज घेतलेल्या शेतमजूर कुटुंबाचे सरासरी कर्ज रु. २८६१.११ आहे. निवडलेल्या १०५ स्त्री शेतमजूर कुटुंबाचे सरासरी कर्ज रु. ४९०.४७ होते.

कोष्टक क्र.५.१६

शेतमजूर कुटुंबाचे कर्जप्रकारानुसार वर्गीकरण

| अ.नं. | कर्जाचा मार्ग | संख्या | एकूण कर्ज घेणाऱ्या कुटुंबाशी प्रमाण (१८) |
|---|---|---|---|
| १) | बँक | ९ | ५०.०० |
| २) | सावकार | ७ | ३८.८८ |
| ३) | मित्र व नातेवाईक | १ | ५.५६ |
| ४) | गहाण ठेवून घेतलेले कर्ज | १ | ५.५६ |
| ५) | एकूण | १८ | १००.०० |

कोष्टक क्र. ५.१६ वरून असे दिसून येते की, बँकेकडून कर्ज घेणारी कुटुंबे सर्वात जास्त ९(५० टक्के) आहेत. त्याखालोखाल सावकाराकडून ७(३८.८८ टक्के) कुटुंबे कर्ज घेतात.

वरील माहितीवरून असा निष्कर्ष निघतो की, एकूण स्त्री शेतमजूर कुटुंबापैकी कमी शेतमजूर कुटुंबानी कर्ज घेतलेले आहे. कर्ज घेणाऱ्यांची संख्या कमी येण्याचे कारण काही शेतमजूर पैशाची गरज भासली की मालकाकडून आगाऊ रक्कम घेऊन मजूरीतून फेडतात. तर काही शेतमजूर उधार उधारवारी करतात. त्यामुळेच कर्ज घेणाऱ्यांची संख्या कमी झालेली आहे.

शेतमजूर अलीकडे बँकाकडून कर्ज घेऊ लागले आहेत. त्यामुळे सावकाराकडील कर्ज घेणाऱ्यांची संख्या कमी होत असून बँकाकडून कर्ज घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे. निवडलेल्या स्त्री शेतमजूर कुटुंबाच्या बाबतीतही अशीच परिस्थिती दिसते.

कोष्टक क्र. ५.१७

स्त्री शेतमजुर कुटुंबाचे कर्ज

| अ.नं. | कर्जगट | संख्या | |
|---|---|---|---|
| १) | ५०० पेक्षा कमी | ५ | २७.७८ |
| २) | ५०० ते १००० | ५ | २७.७८ |
| ३) | १००१ ते २००० | २ | ११.११ |
| ४) | २००१ ते ३००० | ३ | १६.६७ |
| ५) | ३००१ ते ५००० | ३ | १६.६७ |
| | एकूण .. | १८ | १००.०० |

कर्ज घेणाऱ्या १८ कुटुंबापैकी ५(२७.७८) कुटुंबाती रु. ५०० पेक्षा कमी कर्ज घेतलेले आहे. तितक्याच लोकांनी ५०० ते १००० पर्यंत कर्ज घेतले आहे. १००१ ते २००० पर्यंत कर्ज घेतलेली फक्त दोन कुटुंबे आहेत.

सामाजिक व सांस्कृतिक माहिती:

आज समाजात व्यक्तीच्या व्यवसायावरून तिच्याजवळ असलेल्या संपत्ती-वरून तिला प्रतिष्ठा प्राप्त होत असते. काही व्यवसायात प्रतिष्ठा मिळते परंतु वेतन कमी असते. परंतु शेतमजूर हा असा वर्ग आहे की, ज्याला मजूरीही कमी मिळते व समाजात प्रतिष्ठाही मिळत नाही. परंतु अलीकडच्या काळात जाती-व्यवस्थेची तीव्रता कमी होत असल्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी वर्गात देखील जागृती होत असल्यामुळे तो शेतमजूरांना चांगल्या प्रकारची वागणूक देऊ लागला आहे.

सामाजिक व सांस्कृतिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने शेतमजूरांना काही प्रश्न विचारले त्याची माहिती खालीलप्रमाणे -

१) मजूरीचे काम करण्यामुळे सामाजिक प्रतिष्ठा मिळते, का ? या प्रश्नाचे ७० स्त्री शेतमजूर स्त्रियांनी होय असेच उत्तर दिले. याचाच अर्थ अलीकडे शेतकरी जागृत होत असून तो शेतमजूरांना प्रतिष्ठा देऊ लागलेला आहे.

२) जात-पात मानणाऱ्यांचा त्रास होतो काय ? या प्रश्नाचे ८५ (९०.४८ %) स्त्री शेतमजूरांनी नाही असेच उत्तर दिले. याचाच अर्थ ग्रामीण भागामध्ये देखील जातीव्यवस्थेचे महत्व कमी होऊ लागले आहे. ग्रामीण समाजात देखील सामाजिक जागृती होत आहे.

३) स्त्रियांच्या सामुदायिक कार्यक्रमात भाग घेता का ?

या प्रश्नाला ७० (६६.६७ टक्के) स्त्रियानी होय असेच उत्तर दिले आहे. म्हणजेच स्त्री शेतमजूर देखील आपली सर्व कामे सांभाळून सण, उत्सव, बारसे, लग्न, इतर सामुदायिक कार्यक्रमात भाग घेतात.

४) शिक्षणाबद्दल आपणास आवड आहे का ? या प्रश्नाचे होय असे उत्तर ७८ (७४.२९ टक्के) स्त्रियांनी दिले आहे. यावरुन असा निष्कर्ष निघू शकतो की ग्रामीण भागातील शेतमजूर स्त्रियानी शिक्षणाचे महत्त्व ओळखले आहे. याचाच परिणाम म्हणजे ५ वर्षांवरील १२२ मुलामुलींपैकी ११५ मुले-मुली शिक्षण घेत आहेत.

५) प्रौढ शिक्षणात सहभागी व्हावेसे वाटते का ? या प्रश्नाचे होय असे उत्तर ६३ (६० टक्के) स्त्रियांनी दिले आहे. म्हणजेच त्या फक्त मुलांनाच शाळेला पाठवितात असे नाही तर स्वत: देखील लिहा वाचावयास शिकावे असे त्यांना वाटू लागले आहे.

६) हुंडा घ्यावा का घेवू नये ? या प्रश्नाचे घ्यावे असे उत्तर २१ (२० टक्के) स्त्रियांनी व घेऊ नये असे उत्तर ८४ (८० टक्के) स्त्रियांनी दिले आहे. याचाच अर्थ हुंडा ही अनिष्ट प्रथा आहे याची जाणीव त्यांच्यात निर्माण झाली आहे.

७) गावात जातीभेद मानला जातो का ?

या प्रश्नाचे होय असे उत्तर २५ (२३.८१ टक्के) स्त्रियांनी दिले आहे. याचाच अर्थ जातीभेद कमी होऊ लागला आहे. रानात कामाला जाणाऱ्या सर्व स्त्रिया एकत्र बसून जेवतात. भेदभाव केला जात नाही. मात्र काही प्रमाणात भेदाभेद हा आढळतोच.

८) आंतरजातीय विवाह व्हावेत की होऊ नयेत ?

याचे व्हावेत असे उत्तर फक्त १८(१७.१४ टक्के) स्त्रियानी दिले आहे. म्हणजे बाकीच्या ८२ स्त्रियांचा याला विरोध आहे. याचाच अर्थ ग्रामीण

भागातील स्त्रियांच्या मनावर अजूनही रूढी, परंपरा, प्रथा यांचा पगडा जास्त आहे.

९) आपली मुले काय व्हावीत असे वाटते ?

या प्रश्नाचे उत्तर बहुतेकानी खूप शिकवीत चांगली नोकरी करावी असे दिले. त्यासाठी त्यांना सर्व प्रकारे सहाय्य करण्याची इच्छाही बऱ्याच जणींनी व्यक्त केली.

१०) आपली संघटना आहे काय ?

याचे होय असे उत्तर फक्त ७ स्त्रियांनी दिले आहे. याचाच अर्थ संघटना नाही. तथापि काम करणाऱ्यांचे गट आहेत. पगारवाढ किंवा इतर काही मागण्या असतील तर गटवार मागणी करतात.

कुटुंबनियोजनविषयक माहिती:

निवडलेल्या स्त्री शेतमजुरांना कुटुंबनियोजन विषयक माहितीही विचारली. त्यावरून असे दिसून येते की, बहुतांश स्त्रियांना कुटुंबनियोजनाची विशेष माहिती नाही. तसेच कुटुंबनियोजनाची इतर साधनेही विशेष वापरली जात नाहीत. मात्र एकूण १०५ स्त्री शेतमजुरांपैकी कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करून घेतलेल्या ८५ (७६.१९ टक्के) स्त्रिया आहेत. कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया न झालेल्या २५ (२३.८१ टक्के) स्त्रिया आहेत. कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया झालेल्या स्त्रियांची संख्या जास्त असल्याचे एक महत्त्वाचे कारण सरकारी दवाखाने व त्यासाठी मिळणारी रोख रक्कम होय.

......